## फौ. कि. अर्ज क्र. ११/२०२४ मधील अंतरीम खावटीच्या अर्जावरील आदेश

प्रस्तुत अर्ज, कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

## अर्जदार हिचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

२. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचा विवाह दि. ०४.०६.२०१४ रोजी झालेला आहे. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याच्याकडे खालखोनी, ता. भातकुली, जि. अमरावती येथे नांदावयास गेली. सुरुवातीपासुन गैरअर्जदार क्र.१ हा संशयीवृत्तीचा आहे. तो अर्जदार हिस शारिरिक व मानसिक त्रास देत होता. तसेच खोटा पुरावा निर्माण करण्याच्या हेतुने अर्जदाराच्या नांवाने फेसबुक अकाउंट तयार केलेव चॅटींग देखील करीत होता. अर्जदार हिच्यावर संशय घेउन तिला मारहाण करीत होता. तसेच चॅटींग करणा–या मुलांचे मोबाईल नंबर घेउन अर्जदाराला त्या मोबाईल नंबरवर बोलायला लावायचा व त्याचे रेकॉर्डिंग करीत होता. अर्जदार हिस परपुरुषासोबत अनैतिक संबंध आहेत असे म्हणून मारहाण करीत होता. गैरअर्जदार क्र.२ ही अर्जदाराची सासू असून स्वयंपाक येत नाही या कारणावरुन घरुन बेकायदेशिरपणे पैशे आणण्याचा तगादा लावीत होती व शिविगाळ करुन मारहाण करीत होती.

३. लग्नाच्या वेळी गैरअर्जदार क्र.१ हा वाहक या पदावर नोकरी करीत होता. सदर लग्नसंबंधातून अर्जदार ही गरोदर राहिली असता गैरअर्जदार क्र.१ याने दुसरे लग्न करायचे आहे म्हणून अर्जदार हिचा ऑक्टोबर २०१४ मध्ये गर्भपात केला. तसेच अर्जदार हिस मारहाण केली. त्यानंतर अर्जदार हिचा दुसरा गर्भपात जून २०१५ मध्ये केला व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच सदर गर्भ हा माझ्यापासून राहिलेला नाही असे म्हणून चारित्र्यावर संशय घेत होता. गैरअर्जदार क्र.३ ही लग्न झाल्यापासून अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचे भांडण लाउन देत होती. गैरअर्जदार क्र.४ ही नणंद असून नेहमी माहेरी यायची व पैसे घेउन येण्याच्या कारणावरुन गैरअर्जदार क्र.१ यास प्रोत्साहन देत होती. दि. ०६.०३.२०१९ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने संध्याकाळी जाणुनबुजून अर्जदाराचा अपघात घडवून आणून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी अर्जदार हिस जास्त मार लागल्यामुळे सिजर करण्यात आले होते. गैरअर्जदार क्र.१ ते ४ हे सुरुवातीपासून अर्जदाराला फारकतीची मागणी करीत होते व ब–याच वेळा बेकायदेशिर मागणी करुन शिविगाळ व मारहाण करीत होते. अर्जदाराच्या वडिलांनी दि.२६.०६.२०२१ रोजी प्लॉट घेण्याकरीता बेकायदेशिर मागणीमुळे रक्कम रु. १,५०,०००/– दिले होते. अर्जदार हिस मे २०२३ मध्ये फारकतीची मागणी करुन घरातून हाकलून दिले. तेव्हापासून अर्जदार ही चोहट्टा येथे राहत आहे. अर्जदार ही

स्वतःचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ आहे. याउलट, गैरअर्जदार क्र.१ हा एसटीमध्ये दर्यापूर डेपोमध्ये वाहक या पदावर कार्यरत असून त्यास दरमहा रु. ३५,०००/– पगार मिळतो. तसेच १९ एकर बागायत शेतजमीन असून दरवर्षी २५–३० लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच स्वतःच्या मालकीचे मोठे घर आहे. गैरअर्जदार क्र.४ ही अंगणवाडी मदतनिस म्हणून दरमहा रु. ७,०००/– कमविते. त्यामुळे अर्जदार हिस दरमहा रु. २५,०००/– अंतरिम खावटी मंजूर करण्यात यावी व मौजे दर्यापूर येथील १७४३.१२ चौ.फु. क्षेत्रफळ असलेले प्लॉट विक्री करु नये अशा मनाई हुकूमाचा आदेश व कौटूंबिक हिंसाचार न करणेबाबत आदेश करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. गैरअर्जदार क्र.१ ते ४ यांनी आपला लेखी जबाब नि. क्र. ६ वर सादर करुन लग्न संबंध मान्य केले आहेत. परंतू असा आक्षेप घेतला की, लग्नानंतर अर्जदार ही दि.०७.०६.२०१४ रोजी नांदण्यासाठी आली. त्यानंतर१३ महिने ती चांगली नांदली. त्या दरम्यान अर्जदार ही २ वेळा गर्भवती राहिली परंतू शिक्षण घ्यायचे आहे व एमपीएससी ची तयारी करायची असल्याने स्वतः गैरअर्जदार यास न सांगता औषधे घेउन गर्भपात केला आहे. दि.०४.०७.२०१५ रोजी अर्जदार वगैरअर्जदार क्र.१ हे अकोला येथे रुम करुन राहू लागले. एप्रिल २०१७ पर्यंत अकोल्यात राहिले, त्या दरम्यान अर्जदार हिच्या संपूर्ण शिक्षणाचा खर्च गैरअर्जदार याने केलेला आहे. अर्जदार

ही उच्चशिक्षित असून माहेरी शिकवणी घेत आहे. तसेच ब्युटी पार्लर व केकचा व्यवसाय करुन दरमहा रु. १०–१५ हजार उत्पन्न मिळवते. अर्जदार ही छोट्या छोट्या कारणावरुन वाद निर्माण करीत होती तसेच घरातील कामे करीत नव्हती व गळ्यातील मंगळसुत्र फेकून देत होती. तसेच तु माझ्यासाठी मेला, मी उद्या तुझ्या तेरविच्या लोकांना जेवण जेउ घालते असे म्हणून परीसरातील लहान मुलांना बोलाउन जेवण घातले आहे. तसेच गैरअर्जदार क्र.१ याची नोकरी आवडत नव्हती त्यामुळे त्याला चिल्लर जमा करणारे लोक आहात असे म्हणत होती. तसेच शिविगाळ करुन भांडणतंटा करीत होती. गैरअर्जदार यांना खोट्या गुन्हयामध्ये अडकवण्याची धमकी देत होती.

५. दि.३१.१०.२०२३ रोजी अर्जदार हिच्या वडिलांचा मृत्यू झाला त्यावेळी अर्जदार माहेरी गेली. त्यानंतर पुन्हा परत नांदण्यासाठी आली नाही. अर्जदार हिने आपली जबाबदारी पुर्ण केलेली नाही. गैरअर्जदार हा भविष्याचा विचार करुन अर्जदार हिस आजदेखील नांदवण्यास तयार आहे. अर्जदार ही स्वतःहून माहेरी राहत आहे. त्यामुळे तिला खावटी मागण्याचा अधिकार नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

६. अर्जदार हिचे अर्जातील कथन, गैरअर्जदार यांचा लेखी जबाब व

अभिलेखावरील कागदपत्रावरुन खालील मुद्दे विचारार्थी उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिचा गैरअर्जदार यांनी कौटूंबीक छळ केल्याचे सकृतदर्शनी शाबीत केले आहे काय ? | ...अंशतःहोकारार्थी |
| २. | अर्जदार हिने मागणी केल्याप्रमाणे गैरअर्जदारांकडून अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? | ...अंशतः होकरार्थी |
| ३. | अर्जदार हिने मागणी केल्याप्रमाणे मनाई हुकूमाची मागणी मंजूर होणेस पात्र आहे काय ? | ...नकारार्थी |
| ४. | अर्जदार हिने मागणी केल्याप्रमाणे संरक्षाणाचे आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | ...होकरार्थी |
| ५. | काय आदेश ? | अंतिम आदेशानुसार. |

## कारणमीमांसा

७. अर्जदार हिने आपल्या अर्जाच्या समर्थनात दि.२४.११.२०२३ रोजी दिलेला तक्रारी अर्ज, पोस्टाची पावती, ग्राम पंचायत नमुना ८ उता-याची छायांकित प्रत, भूमापन क्र. १८, ७४ चे ७/१२ उतारे, कराची पावती, पगारपत्रकाची छायांकित

प्रत, खरेदी दस्त क्र. २१८४/२०२१ ची छायांकित प्रत अशी कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांचा **रजनिशी – वि– नेहा, फौजदार अपील क्र. ७३०/२०२०** मधील निर्देशानुसार मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र निशाणी क्र.७ वर सादर केले आहे.

८. सामनेवाला यांनी आपल्या बचावा मध्ये वैद्यकिय कागदपत्राच्या सत्यप्रती, कर्जफेडीबाबतच्या पत्राची सत्यप्रत, पगारपत्रकाची सत्यप्रत, खातेउता–याची छायांकित प्रत व माननिय उच्च न्यायालय, खंडपिठ नागपूर यांच्या समोरील फौजदारी अर्ज क्र. १५५६/२०२५ मधील दि.२३.०२.२०२६ मधील आदेश अशी कागदपत्रे सादर केली असून मालमत्ता व उत्तरदायित्वाचे शपथपत्र निशाणी ५ वर सादर केले आहे.

९. अर्जदारातर्फे विद्वान विधिज्ञ श्री. आर.एफ. काझी यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच गैरअर्जदारांतर्फे विधीज्ञ एस.एस. खवले यांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र.१ साठी</u>** –

१०. महिलांचा कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा, २००५ च्या कलम

२० नुसार पिडीतग्रस्त महिलांना पोटगी देण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. तसेच कलम २३ नुसार कलम २० मधील पोटगी ही अर्ज दाखल झाल्यानंतर मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम स्वरुपात देण्याचा अधिकार देखील आहे. परंतु सदर पोटगी देण्यासाठी सामनेवालांनी अर्जदार हिचा मानसिक व शारीरिक छळ केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होणे आवश्यक आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्या कथनावरुन आपसातील नातेसंबंध मान्य असल्याचे स्पष्ट होते. तसेच गैरअर्जदार यांच्यातर्फे अर्जदारासोबत कौटूंबिक नातेसंबंध नसल्याबाबत कोणताही बचाव घेण्यात आला नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कौटूंबिक नातेसंबध असल्याचे प्रथमदर्शनी शाबित होते.

११. अर्जदार हिच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र. १ हा संशयी वृत्तीचा असुन अर्जदाराच्या नांवाने फेसबुक अकाउंट उघडुन त्यावर चॅटींग करीत होता व अर्जदार हिस मुलांसोबत बोलायला लावत होता. त्या कारणावरुन अर्जदार हिस शिविगाळ व मारहाण करीत होता. तसेच गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिचा दोन वेळा गर्भपात घडउन आणल्याचा व अपघात घडवून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न होता असा गंभिर आरोप केलेला आहे. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा प्लॉट घेण्याकरीता माहेरुन रु.५.०० लाख घेउन येण्याची मागणी करीत होता. त्या कारणावरुन मे २०२३ मध्ये फारकतीची मागणी

करुन अर्जदार हिस माहेरी हाकलून दिल्याचे कथन केले आहे. याउलट, गैरअर्जदार यांनी अर्जदार ही घरातील कामधंदा करीत नव्हती, भांडणतंडा करीत होती व खोट्या गुन्हयामध्ये अडकवण्याची धमकी देत होती. अर्जदार ही तिच्या वडिलांचा मृत्यू झाल्यापासून स्वतःहून माहेरी राहत असल्याचा बचाव घेतला आहे. अर्जदारातर्फे करण्यात आलेले आरोप जास्त गंभिर स्वरुपाचे आहेत. तसेच अर्जदार हिने सादर केलेल्या दि. २४.११.२०२३ रोजीच्या दहिहांडा पोलीस ठाणे यांना दिलेल्या तक्रारीमध्ये वरील प्रमाणे घटना नमूद केलेली असल्याचे स्पष्ट होते. तो तक्रारी अर्ज प्रस्तुत खटला दाखल करण्यापुर्वी सादर करण्यात आला असल्याचे स्पष्ट होते. साहजिकपणे कोणतिही स्त्री कोणतेही कारण नसतांना आपल्या पतीविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार देणार नाही. वरील सर्व विश्लेषणाचा विचार करता गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिचा कौटूंबिक छळ केल्याचे प्रथमदर्शनी शाबित होते.

१२. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र. २ सासू हिच्याविरुध्द घरातील स्वयंपाक येत नाही व पैश्यांचा तगादा लावण्यावरुन त्रास दिल्याचा आरोप केला आहे. तसेच गैरअर्जदार क्र. ३ जेठाणीविरुध्द भांडण लाउन देत असल्याचा आरोप केलेला आहे. गैरअर्जदार क्र. ४ नणंद हिच्याविरुध्द माहेरुन पैसे घेउन येण्याच्या कारणावरुन त्रास दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. पैश्यांच्या मागणीच्या कारणावरुन शारिरिक व

मानसिक छळ करणे हे भादंवि कलम ४९८–अ च्या संज्ञेमध्ये येते. गैरअर्जदार यांच्यातर्फे फौजदारी अर्ज क्र. १५५६/२०२५ मधील दि. २३.०२.२०२६ रोजीच्या आदेशाची प्रत सादर केली आहे. त्याचे अवलोकन केले असता माननिय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपिठ नागपूर यांनी गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांच्याविरुध्द केलेले आरोप भादंवि कलम ४९८–अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ हे मोघम स्वरुपाचे आहेत असे निष्कर्ष नोंदवून त्यांच्याविरुध्द प्रथम खबर अहवाल क्र. ९५/२०२४ रद्दबातल ठरविला आहे. महिलांचा कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम अंतर्गत कौटूंबिक छळ हा भादंवि कलम ४९८–अ मधील छळापेक्षा जास्त व्यापक आहे. त्यामुळे जो छळ ४९८–अ मध्ये येत नाही तो कौटूंबिक छळामध्ये येउ शकतो. अर्जदार हिने या खटल्यामध्ये गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांच्याविरुध्द केलेले आरोपहे जरी काही प्रमाणात भादविं कलम ४९८–अ मधील तरतुदीप्रमाणे असले तरी काही आरोप हे त्या तरतुदीच्याबाहेर जाउन कौटूंबिक छळ या संज्ञेमध्ये येणारे असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे साहजिकपणे भादंवि कलम ४९८–अ, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांच्याविरुध्दचे आरोप रद्दबातल ठरवले गेले असले तरी त्यावरुन गैरअर्जदार यांनी कौटूंबिक छळ केलेला नाही असा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. तसेच जोपर्यंत गैरअर्जदार क्र.२ ते ४ यांनी कौटूंबिक छळ केल्याचे

पुरावयानिशी शाबित होत नाही तोपर्यंत त्यांच्याविरुध्द कौटूंबिक छळाबत कोणताही निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. प्रस्तुतचा अर्ज निर्णीत करण्यासाठी गैरअर्जदार क्र. १ याचे राहणीमानाचा दर्जा व त्याने कौटूंबिक छळ केला आहे किंवा नाही एवढे विचारात घेणे आवश्यक आहे. गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांनी कौटूंबिक छळ केला आहे किंवा नाही हा मुद्दा प्रस्तुतचा अर्ज निकाली करतांना गौण ठरणारा आहे. वरील सर्व विश्लेषणावरुन मी मुद्दा क्र. १ यास अंशतः होकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

## मुद्दा क्र. २ साठी –

१३. अर्जदार हिने ती स्वतःचा उदरनिर्वाह चालविण्यास असमर्थ असल्याचे कथन केले आहे. तसेच निशाणी क्र. ७ वरील मालमत्ता व उत्तरदायित्वाच्या शपथपत्रामध्ये तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे नमूद केलेले आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार ही उच्चशिक्षित असून माहेरी शिकवणी, ब्युटी पार्लर व केकचा व्यवसाय करुन दरमहा रु. १०–१५ हजार उत्पन्न मिळवत असल्याचा बचाव घेतलेला आहे. परंतू त्याबाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. त्यामुळे अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह चालविण्यास असमर्थ असल्याचा निष्कर्ष काढला जाउ शकतो.

१४. अर्जदार हिने आपल्या अर्जामध्ये गैरअर्जदार हा एसटीमध्ये वाहक पदावर नोकरीस असून त्यास दरमहा रु. ३५,०००/– व जास्तीचे काम करुन दरमहा रु. १५,०००/– अधिकचे वेतन मिळत असल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदार याने आपल्या लेखी जबाबामध्ये तो एसटीमध्ये वाहक पदावर नोकरीस असल्याचे कबूल केले आहे. तसेच गैरअर्जदारातर्फे माहे जुलै २०२५ या महिन्याचे पगारपत्रक अभिलेखावर सादर केले आहे. त्यानुसार गैरअर्जदार क्र.१ यास एकूण वेतन रु.१२,१०६/– मिळाले होते व सर्व रक्कम वजा जाता त्याच्या हातात रक्कम रु. २,९९०/– मिळाल्याचे स्पष्ट होते. अर्जदार हिने निशाणी क्र. १४ च्या वर्णन यादीसोबत माहे ऑगष्ट २०२२ चे पगारपत्रकाची छायांकित प्रत सादर केली आहे. सदर पगारपत्रक बनावट असल्याचा बचाव गैरअर्जदार याच्यातर्फे घेण्यात आलेला नाही. त्यानुसार गैरअर्जदार क्र. १ यास एकूण वेतन २९,६१५/– मिळाले होते व त्याच्या हातामध्ये रक्कम रु. २४,५८१/– प्राप्त झाले होते हे स्पष्ट होते. गैरअर्जदार क्र.१ याने नि.क्र. ५ वरील मालमत्ता व उत्तरदायित्वाच्या शपथपत्रामध्ये त्यास दरमहा रु. २२,०००/– मिळत असल्याचे कबूल केलेले आहे. त्यावरुन गैरअर्जदार क्र. १ याच्या उत्पन्नाचा व राहणीमानाचा अंदाज लावला जाउ शकतो.

१५. अर्जदार हिने आपल्या अर्जामध्ये गैरअर्जदार क्र. १ याच्याकडे १९ एकर

सुपिक जमिन असून दरवर्षी २५–३० लाख रु. उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले आहे. अर्जदारातर्फे गट क्र. १८, ७४ चे ७/१२ उतारे अभिलेखावर सादर करण्यात आले आहेत. सदर ७/१२ उता–यावरुन गैरअर्जदार क्र. १ याचे नांव इतर व्यक्तींसोबत सामाईकात मालकी हक्कासदरी असल्याचे स्पष्ट होते. तसेच सदर ७/१२ उता–यांवर कापूस, तुर व सोयाबिन अशा प्रकारच्या पिकांची नोंद असल्याचे दिसून येते. त्यावरुन सदर शेतमिळकतीतून उत्पन्न काढले जात असल्याचे स्प्ष्ट होते. परंतू गैरअर्जदार याने आपल्या मालमत्ता व उत्तरदायित्वाच्या शपथपत्रामध्ये सदर शेतमिळकतीचा उल्लेख केला नसल्याचे स्पष्ट होते. सदर शेतमिळकतीच्या संपुर्ण क्षेत्राचा विचार करता गैरअर्जदार क्र. १ यास किती उत्पन्न मिळू शकते याचा अंदाज जावला जावू शकतो. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ यास शेतमिळकतीतून देखील उत्पन्न मिळत असल्याचे शाबित होते.

१६. अर्जदार हिने आपल्या अर्जामध्ये पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र. १ याच्या मालकीचा दर्यापूर येथे १७४३.१२ चौ.फु. प्लॉट आहे. परंतू त्या प्लॉटमिळकतीतून उत्पन्न मिळत असल्याचे कथन अर्जदाराने केलेले नाही. गैरअर्जदार क्र. १ याने त्याच्या नांव प्लॉट मिळकत असल्याचे कबूल केले आहे परंतू त्यातून उत्पन्न मिळत नसल्याचा बचाव घेतलेला आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ यास

प्लॉटमिळकतीतून उत्पन्न मिळत असल्याचे शाबित होत नाही. परंतू त्यावरुन गैरअर्जदार क्र.१ याच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज लावला जाउ शकतो.

१७. अर्जदार हिला कोणत्याही खटल्यामध्ये खावटी मंजूर झाली असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत नाही. तसेच अर्ज दाखल तारखेपासून गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था केली नसल्याचे दिसून येते. वरील सर्व विश्लेषणावरुन गैरअर्जदार क्र. १ याच्या उत्पन्नाचा विचार करता व त्याच्या राहणीमानाच्या दर्जाचा विचार करता त्याची अर्जदार हिस दरमहा रु. १०,०००/- प्रमाणे अंतरिम खावटी देण्याची ऐपत असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याच्याप्रमाणे राहणीमानाचा दर्जा मिळण्यास पात्र ठरते. तसेच अंतरिम खावटी ही अर्ज दाखल तारखेपासून मिळण्यास पात्र ठरते. त्यामुळे मुद्दा क्र. २ यास अंशतः होकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ व ४ साठीः-</u>**

१८. अर्जदार हिने आपल्या अर्जामध्ये गैरअर्जदार याने त्याच्या नांवे असलेला मौजे दर्यापूर येथील १७४३.१२ चौ.फ. क्षेत्रफळाचा प्लॉट विक्री करु नये अशा मनाई हुकूमाची मागणी केली आहे. परंतू आपल्या अर्जामध्ये त्या प्लॉटचा क्रमांक नमूद केलेला

नाही. केवळ छायांकित दस्त अभिलेखावर सादर केलेला आहे. सदर प्लॉटची सध्याची काय परिस्थिती आहे याबाबत कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. तसेच प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासून सुमारे अडिच वर्ष उलटून गेले आहेत. सदर कालावधीमध्ये अर्जदार ही दिवाणी न्यायालय यांच्याकडे योग्य ती दाद मागू शकली असती परंतू अर्जदाराने तसे केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदार हिची मनाई हुकूमाची मागणी मंजूर होण्यास पात्र नसल्याचे स्पष्ट होते.

१९. अर्जदार हिने प्रस्तुत अर्जामध्ये गैरअर्जदार यांनी तिचा कौटूंबिक छळ करु नये अशा आदेशाची मागणी केली आहे. अर्जदार हिच्या कथनानुसार ती मे २०२३ नुसार आपल्या माहेरी राहत आहे. त्यानंतर देखील गैरअर्जदार क्र. १ ते ४ हे त्रास देत असल्याचे कथन केलेले आहे. परंतू गैरअर्जदार क्र. २ ते ४ यांनी कौटूंबिक छळ केल्याचे प्रथमदर्शनी कोणताही निष्कर्ष काढला गेला नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द कौटूंबिक छळ करु नये असा आदेश पारित करणे योग्य ठरणार नाही. परंतू गैरअर्जदार क्र. १ याने कौटूंबिक छळ केल्याचे प्रथमदर्शनी शाबित झाले असल्यामुळे त्याच्याविरुध्द कौटूंबिक छळाची पुनरावृत्ती करु नये असे आदेश पारीत करणे जरुरीचे ठरते. त्यामुळे मुद्दा क्र. ३ यास नकारार्थी उत्तर नोंदवून मुद्दा क्र. ४ साठी होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. ५ साठी खालील आदेश पारीत करित आहे.

# <u>आदेश</u>

अ) अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

ब) गैरअर्जदार क्र.१ याने अर्ज दाखल तारखे पासुन अर्जदार हिस दरमहा रुपये १०,०००/- प्रमाणे खटल्याचा अंतिम निकाल लागेपावेतो अंतरिम खावटी देण्याचा आदेश पारित करण्यात येतो.

क) अर्जदार हिची मनाई हुकूमाची मागणी नामंजूर करण्यात येते.

ड) अर्जाचा खर्च म्हणून गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिस रु. १,०००/- द्यावेत.

इ) गैरअर्जदार क्र.१ याने खटल्याचा अंतिम निकाल लागेपावेतो अर्जदार हिचा कौटूंबिक छळ होईल असे कोणतेही कृत्य करु नये असा आदेश पारीत करण्यात येतो.

ई) आदेशाची एक प्रत अर्जदार हिस निशुःल्क देण्यात यावी.

ARIF HARUN SHAIKH

Digitally signed by ARIF HARUN SHAIKH
Date: 2026.07.22 13:53:01 +0530

(ए.एच.शेख)

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,

दिनांकः २२.०७.२०२६ (न्यायालय क्र. १) अकोट.

| **CERTIFICATE** | |
|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Order/Judgment. | |
| Name of the Stenographer | Santosh S. Kale Gr-III |
| Court | Jt. Civil Judge (J.D.), Akot. |
| Date | 22.07.2026 |
| Judgment/Order signed by PO | 22.07.2026 |
| Judgment/Order uploaded on | 22.07.2026 |